औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यास[illegible]
अशासकीय तंत्रसंस्थांना आर्थिक सहाय्य..

१९८३-८४ साठी तदर्थ अनुदान...

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्र.पीसीआय-११८३/(१२)/तांशि-१ ब.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक-२ जुलै १९८३.

पहा:-१) शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग क्र. सिटीई-११७७/
१३१६२६(३३४०)/९ दि. १८ मे, १९७८.
२) तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र. २२-जिआयए-
८०८३/३०७८, दिनांक- २४ आक्टोबर १९८३ चे पत्र.

शासन निर्णय- शासनाने १९८०-८१ मध्ये "औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, मिरज मेडिकल सेंटर, मिरज" या संस्थेस व १९८१-८२ मध्ये "आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संस्था, उस्मानाबाद" व "महाराष्ट्र शिक्षण समितीचे तंत्रनिकेतन, निलंगा, जिल्हा लातूर या संस्थांना, प्रारंभी ३० प्रवेशक्षमतेसह औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. तसेच १९८२-८३ या शैक्षणिक वर्षापासून सदर संस्थांना प्रवेशक्षमता ३० वरुन ६० वर नेण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

२. उपरोक्त संस्थांचे प्रकल्प अहवाल अद्याप अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळाच्या पश्चिम विभागीय समितीपुढे मान्यतेसाठी प्रलंबित असून सदर समितीच्या मान्यतेनंतर समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन सदर संस्थांना योग्य ते अनुदान देय होणार आहे. तोपर्यंत तदर्थ म्हणून सदर संस्थांना १९८३-८४ या वर्षासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे रुपये ७ लक्ष (रुपये ६ लक्ष आवर्ती + रुपये १ लक्ष अनावर्ती) एवढे अनुदान देय करण्यास या निर्णयाद्वारे शासन तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अधिकार प्रदान करीत आहे :-

True Copy
Principal
SSVSS
Institute of Pharmacy, Miraj

| संस्था | तदर्थ अनुदान | |
|---|---|---|
| | आवर्ती रुपये | अनावर्ती रुपये |
| १. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, मिरज मेडिकल सेंटर, मिरज, जि. सांगली. | २,००,०००/- | निरंक |
| २. आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संस्था, उस्मानाबाद. | २,००,०००/- | ७५,०००/- |
| ३. महाराष्ट्र शिक्षण समितीचे तंत्रनिकेतन, निलंगा, जि. लातूर. | २,००,०००/- | २५,०००/- |
| एकूण रुपये | ६,००,०००/- | १,००,०००/- |

३. तंत्रशिक्षण संचालकांनी सदर संस्थांचे या अगोदर दिलेले अनुदान खर्च केल्याचे दाखले, खर्चाच्या प्रगतीचे वेळोवेळी सादर करण्यात आलेले अहवाल व लेखापरीक्षण विवरण इत्यादी गोष्टी समाधानकारक असल्याची खात्री करुन घेऊन नंतरच अनुदान खालील अटींवर मंजूर करावे :-

१] अनुदान ज्या कार्यासाठी दिले जात आहे, त्याच कार्यासाठी ते वापरले जाईल.

२] मंजूर करण्यात आलेली रक्कम वा तिचा कोणताही हिस्सा दुसऱ्या कोणत्याही कार्यासाठी वापरण्यात येणार नाही. अनुदान वा त्याचा हिस्सा वापरला न गेल्यास पुढे देण्यात येणाऱ्या अनुदानाशी समायोजित केला जाईल.

३] या अनुदानातून सर्वस्वी वा बव्हंशी जी मालमत्ता खरेदी करण्यात येईल तिची शासनाच्या पूर्व परवानगी वाचून विल्हेवाट वा विहित कार्याव्यतिरिक्त इतर कार्यासाठी वापर केला जाणार नाही.

४] कोणत्याही कारणाने संस्था बंद झाली अथवा केली गेली किंवा सदर अभ्यासक्रम बंद झाला वा केला गेला तर या अनुदानातून सर्वस्वी वा बव्हंशी खरेदी केलेली स्थावर वा जंगम मालमत्ता, इमारत, साधन सामुग्री इ. कोणत्याही बोजा व्यतिरिक्त शासनाकडे देण्यात येईल.

५] अनुदानातून खरेदी केलेल्या साधन सामुग्रीबाबत संस्था शासनाशी करारनामा [ॲग्रीमेंट बॉंड] करील.

३.....

६] अनुदान ज्या कार्यासाठी मंजूर करण्यात आले, त्याच कार्यासाठी ते वापरल्याची संस्थेने त्यासाठी नियुक्त केलेल्या लेखा परीक्षकांच्या सहीचे, संस्थेच्या लेखा परीक्षित हिशेबासह एक प्रमाणपत्र संस्थेकडून तंत्र शिक्षण संचालकांकडे पाठविण्यात येईल.

७] दर तिमाहीस खर्च कसा होत आहे, त्याचे विवरण पत्र तंत्र शिक्षण संचालकांस पाठविण्यात येईल.

८] महालेखापाल वा त्यांच्या प्रतिनिधींनी इच्छा प्रदर्शित केल्यास, या अनुदानाबाबतचे सर्व हिशेब व संबंधित कागदपत्र त्यांना तपासणीसाठी उपलब्ध केले जातील.

९] संस्थेचे हिशेब वर्षातून अेकदातरी शासनाने मान्य केलेल्या लेखा परीक्षकांकडून तपासले जातील.

१०] लेखा परीक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद शासन व महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर यांना संस्थेकडून पाठविले जातील.

११] कॉम्प्ट्रोलर व ऑडिटर जनरल [ड्यूटीज, पॉवर्स व कंडीशन ऑफ सर्विस] अधिनियम १९७१ च्या १४ व्या परिच्छेदानुसार संस्था ती संस्था ज्या चालकां/विश्वस्तांकडून चालविली जाते, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांचे हिशेब लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करील.

१२] जर अनावर्ती अनुदान लेखा हिशोबापेक्षा जास्त दिल्याचे आढळून आल्यास, पुढे देण्यात येणा-या अनावर्ती अनुदानातून समायोजित करण्यात येईल.

१३] अटी मान्य असल्याचे संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांना कळवावे.

४. या प्रस्तावावरील खर्च, "२७७-शिक्षण-एफ-तंत्रशिक्षण [एपी] बिनसरकारी तंत्र व औद्योगिक संस्थांना सहाय्य-[दोन] पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-[बी] तंत्रनिकेतने" या अर्थशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व तो त्यासाठी १९८३-८४ मध्ये करण्यात आलेल्या आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

४....

True Copy
Principal
SSVSS
Institute of Pharmacy, Mirai

५. हा निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: ४५४/इएक्सपी-५/८३, दिनांक १९. २. १९८३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ सु० न० पानसरे ]
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
प्राचार्य, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, मिरज मेडिकल सेंटर, मिरज, जि. सांगली.
प्राचार्य, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संस्था, उस्मानाबाद.
प्राचार्य, महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, निलंगा, जिल्हा लातूर.
जिल्हा कोषाधिकारी, सांगली/उस्मानाबाद/लातूर.
नियोजन विभाग [पीआरजी-११].
वित्त विभाग [इएक्सपी-५]
शिक्षण व सेवायोजन विभाग, बीयुडी-२.
निवड नस्ती, तांशि-१[स].

True Copy
Principal
SSVSS
Institute of Pharmacy, Miraj